तहसिलदार संवर्गातील अधिका-यांची पदस्थापना
श्री.रमेश मुंडलोड, तहसिलदार

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
शासन आदेश क्र. बदली-२०२६/प्र.क्र.१० (१)/आस्था-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०६ एप्रिल, २०२६

**संदर्भ**:- १) शासन आदेश क्र. विभाचौ-२५२४/२७१/प्र.क्र.३०/ई-४, दिनांक २६.०६.२०२५
२) शासन आदेश क्र. विभाचौ-२५२४/२७१/प्र.क्र.३०/ई-४, दिनांक १२.१२.२०२५

**शासन आदेश:-**

श्री. रमेश मुंडलोड हे अपर तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर या पदावर कार्यरत असतांना मौ. आडगांव (बु) येथील देवस्थान इनाम जमीन गट नं.५२, ७९, १३५ व मौ. गांधेली येथील देवस्थान इनाम जमीन गट नं. २९३ या गटातील देवस्थान इनाम क्षेत्र १८० एकर या जमिनीस कुळ कायदा लागू होत नसताना बेकायदेशीर रित्या कुळ कायद्याचा आधार घेवून खाजगी लोकांच्या नावे करून व देवस्थान मालमत्तेची बेकायदेशीर विल्हेवाट असद हेतूने करण्याची बाब शासनाच्या निदर्शनास आल्याने श्री. रमेश मुंडलोड यांना तहसिलदार, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण या पदावर कार्यरत असताना संदर्भाधीन क्र.०१ येथील शासन आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले होते.

२. तद्नंतर संदर्भ क्र.२ येथील शासन आदेशान्वये त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात आले असून, ते नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत.

३. सबब, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) (एक) मधील तरतुदींनुसार श्री.रमेश मुंडलोड यांची खालील तक्त्यातील स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय कारणास्तव सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने पदस्थापना करण्यात येत आहे.

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे पदनाम | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री.रमेश मुंडलोड, तहसिलदार | नियुक्तीच्या प्रतिक्षेत | **स्थावर व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, गंगापूर मळा, जि.छत्रपती संभाजीनगर या प्रतिनियुक्तीच्या पदावर** |

४. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून उपरोक्त नमूद अधिकारी यांनी स्तंभ क्र.४ मधील नमूद पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. संबंधीत अधिकारी त्यांना देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत e३.revenue@maharashtra.gov.in या ईमेलद्वारे / टपालाद्वारे शासनास त्वरीत कळवावे.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा **अनुपस्थितीचा कालावधी हा "अकार्यदिन"** *(dies non)* **म्हणून गणला जाईल**, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. संबंधित अधिकाऱ्यास शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

७. सदरहू आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामूळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०२६०४०६१६१३३८६६१९ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.04.06 17:31:35 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.
२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

- मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

- मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- मा.मंत्री (महसूल) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
- संबंधित जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
- संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
- संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
- संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
- संबंधित तहसिलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
- सह सचिव (आस्था-३) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
- निवडनस्ती (आस्था-३).